भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# नियोक्ता दायित्व अधिनियम, १९३८

(१९३८ चा अधिनियम क्रमांक २४)

[१ मार्च १९९५ रोजी यथाविद्यमान]

# The Employers' Liability Act, 1938

(Act No. 24 of 1938)

[As in force on the 1st March 1995]

संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४
यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९८

[ किंमत रु. १-०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत दिनांक १ मार्च, १९९५ रोजी यथाविद्यमान असलेला दि एम्प्लॉयर्स लायेबिलिटी ॲक्ट, १९३८ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ६, अंक १ दिनांक २२ जून १९९५ यात पृष्ठ ७१ ते ७२ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधी) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली.
दिनांक २२ जून १९९५.

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Employers' Liability Act, 1938 as on the 1st March 1995 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 6, dated 22nd June 1995 on pages 71 to 72

This Authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

NEW DELHI,
Dated 22nd June 1995.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India

## विशोधन अधिनियम व आदेश यांची सूची

१. 'भाग ख राज्ये (कायदे) अधिनियम, १९५१' (१९५१ चा अधिनियम ३).

२. 'केंद्रीय कामगार कायदे (जम्मू व काश्मीरवर विस्तारण) अधिनियम, १९७०' (१९७० चा अधिनियम ५१).

३. 'विधि अनुकूलन आदेश, १९५०'.

४. १९५१ चा अधिनियम ५.

# नियोक्ता दायित्व अधिनियम, १९३८

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. व्याख्या.

३. विवक्षित प्रकरणांमध्ये 'सहसेवकत्व' हा बचाव देण्यास आडकाठी.

३क. संविदेद्वारे दायित्वमुक्त करणे.

४. पूर्ण ज्ञान असल्याशिवाय, धोका पत्करला होता असे गृहीत धरावयाचे नाही.

५. व्यावृत्ती.

शब्दसूची—इंग्रजी-मराठी
मराठी-इंग्रजी.

# नियोक्ता दायित्व अधिनियम, १९३८

## (१९३८ चा अधिनियम क्रमांक २४)

(दिनांक १ मार्च १९९५ रोजी यथाविद्यमान)
[२४ सप्टेंबर, १९३८]

**कामगारांना पोचलेल्या इजांबाबत [1]* * * लावलेल्या नुकसानी—दाव्यांमध्ये विवक्षित बचाव देता येणार नाहीत असे घोषित करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, कामगारांना पोचलेल्या इजांबाबत [1]* * * लावलेल्या नुकसानी—दाव्यांमध्ये विवक्षित बचाव देता येणार नाहीत असे घोषित करणे समयोचित आहे;

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास 'नियोक्ता दायित्व अधिनियम, १९३८' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व विस्तार.

(२) त्याचा विस्तार [2]* * * संपूर्ण भारतभर आहे.

२. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,— व्याख्या.

(क) "कामगार" याचा अर्थ, ज्या व्यक्तीने नियोक्त्याशी नोकरीची किंवा शिकाऊ उमेदवारीची संविदा केलेली असेल किंवा जी व्यक्ती त्या संविदेखाली काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती असा आहे—मग ते काम अंगमेहनतीचे असो वा कारकुनी असो वा अन्य प्रकारचे असो—आणि ती संविदा व्यक्त असो वा उपलक्षित असो, तोंडी असो वा लेखी असो ; आणि

(ख) "नियोक्ता" यामध्ये कोणताही व्यक्तिनिकाय—मग तो निगमित असो वा नसो,—नियोक्त्याचा कोणताही व्यवस्थापन एजंट आणि, मृत नियोक्त्याचा वैध प्रतिनिधी यांचा समावेश होतो, आणि ज्या व्यक्तीबरोबर कामगाराने नोकरी किंवा शिकाऊ उमेदवारीची संविदा केलेली असेल तिने त्या कामगाराची सेवा अन्य व्यक्तीला उसनवारीने किंवा भाड्याने दिलेली असेल तर, जोपर्यंत तो कामगार त्या अन्य व्यक्तीसाठी काम करत असेल तोपर्यंत "नियोक्ता" याचा अर्थ अशी अन्य व्यक्ती असा आहे.

३. जर एखाद्या कामगाराला पुढीलपैकी कोणत्याही कारणाने शारीरिक इजा पोचली तर, त्या कामगाराने किंवा त्याचा मृत्यू झाल्यास हक्कदार होणाऱ्या कोणाही व्यक्तीने त्या इजेसंबंधी लावलेला नुकसानीचा दावा, इजा पोचली त्यावेळी तो कामगार नियोक्त्याचा कामगार होता किंवा त्याच्या नोकरीत होता किंवा त्याच्या कामात गुंतलेला होता एवढ्याच वस्तुस्थितीमुळे निष्फळ होणार नाही, ती कारणे अशी :— विवक्षित प्रकरणांमध्ये 'सहसेवकत्व' हा बचाव देण्यास बाधकाठी.

(क) नियोक्त्याने आपला उद्योग किंवा धंदा यांच्याशी संबंधित किंवा त्यामध्ये वापरला जाणारा कोणताही मार्ग, बांधकाम, यंत्रसामग्री किंवा संयंत्र सुस्थितीमध्ये व सुरक्षित ठेवण्यात कसूर केल्यामुळे, अथवा असा मार्ग, बांधकाम, यंत्रसामग्री किंवा संयंत्र सुस्थितीमध्ये व सुरक्षित राहील याची खबरदारी घेण्याची कामगिरी नियोक्त्याच्या नोकरीतील ज्या कोणत्याही व्यक्तीवर नियोक्त्याने सोपवलेली असेल तिच्याकडून तशाच प्रकारची कोणतीही कसूर घडल्यामुळे; अथवा

(ख) नियोक्त्याच्या नोकरीतील ज्या व्यक्तीकडे कोणतेही देखरेखीचे काम सोपवलेले असेल अशा कोणत्याही व्यक्तीने अशी देखरेख करताना केलेल्या हयगयीमुळे; अथवा

(ग) इजा पोचली त्यावेळी कामगार नियोक्त्याच्या नोकरीमध्ये असलेल्या ज्या कोणत्याही व्यक्तीच्या आदेशाच्या किंवा निदेशाच्या अनुसार काम करण्यास बांधलेला होता व त्यावर हुकूम त्याने काम केले होते आणि अशा तऱ्हेने काम करताना त्याला इजा पोचली असे असेल तर, त्या व्यक्तीच्या हयगयीमुळे; अथवा

[3][(घ) नियोक्त्याच्या नोकरीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने—

(एक) आपली कामे ती व्यक्ती नेहमीप्रमाणे पार पाडत असताना, किंवा

(दोन) नियोक्त्याने केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा उपविधीचे पालन करताना (जो नियम किंवा उपविधी त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा त्याखाली एखाद्या प्राधिकरणाकडून संमत होणे आवश्यक असून याप्रमाणे संमत झालेला आहे तो सोडून अन्य), किंवा

---

१. अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतामध्ये" हा शब्द गाळला.

२. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ द्वारे "भाग ख राज्य खेरीजकरून" या शब्दांऐवजी "जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून" हा मजकूर घातला व मागाहून १९७० चा अधिनियम ५१, कलम २ व अनुसूची यांद्वारे तो मजकूर गाळला.

३. १९५१ चा अधिनियम ५, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

(तीन) ज्या व्यक्तीकडे नियोक्त्याने त्यासंबंधात प्राधिकार सोपवला असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या सूचनांचे पालन करताना,

केलेल्या कोणत्याही कृतीमुळे किंवा अकृतीमुळे.]

[1][संविदेद्वारे दायित्वमुक्त करणे.]

[1][३क. नोकरीची किंवा शिकाऊ उमेदवाराची संविदा अथवा तिला सांपाश्विक असा एखादा करार यामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही तरतुदीमुळे परिणामी, नोकरीला असलेल्या किंवा शिकाऊ उमेदवारी करणाऱ्या व्यक्तीला तिच्या बरोबरीच्या कामगार व्यक्तींनी हयगय केल्याकारणाने पोचलेल्या शारीरिक इजासंबंधी नियोक्त्याचे कोणतेही दायित्व अपवर्जित किंवा मर्यादित होण्यासारखे असेल तर, तेथवर ती तरतूद शून्य असेल.]

पूर्ण ज्ञान असल्या-शिवाय, धोका पत्करला होता असे गृहीत धरावयाचे नाही.

४. अशा कोणत्याही नुकसानी-दाव्यामध्ये, त्या कामधंद्याशी संलग्न असलेला कोणताही धोका कामगाराला संपूर्णपणे समजावून देण्यात आला होता व त्याला तो समजलेला होता आणि त्या कामगाराने तो स्वेच्छापूर्वक पत्करलेला होता असे नियोक्त्याने शाबीत केल्याशिवाय, कामगाराने तो धोका पत्करला होता असे मानण्यात येणार नाही.

व्यावृत्ती.

५. अशा कोणत्याही नुकसानी-दाव्यामध्ये या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी दिवाणी न्यायालयाने काढलेला कोणताही हुकूमनामा किंवा आदेश यांच्या विधिग्राह्यतेवर या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही.

---

१. १९५१ चा अधिनियम ५, कलम ३ द्वारे घातले.

## THE EMPLOYERS' LIABILITY ACT, 1938

## नियोक्ता दायित्व अधिनियम, १९३८

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| common employment | सहसेवकत्व | [S. 3-m.n.)] |
| contracting out | संविदेद्वारे दायित्वमुक्त करणे | [S. 3A-m.n.] |
| employer | नियोक्ता | [S. 2(b)] |
| in good and safe condition | सुस्थितीमध्ये व सुरक्षित | [S. 3(*a*)] |
| lend or let on hire | उसनवारीने किंवा भाड्याने देणे | [S. 2(b)] |
| managing agent | व्यवस्थापन एजंट | [S. 2(b)] |
| personal injury | शारीरिक इजा | [S. 3] |
| suit for damages | नुकसानीचा दावा | [S. 3] |
| workman | कामगार | [S. 2(*a*)] |

---

## नियोक्ता दायित्व अधिनियम, १९३८

## THE EMPLOYERS' LIABILITY ACT, 1938

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| उसनवारीने किंवा भाड्याने देणे | lend or let on hire | [क.२(ख्)] |
| कामगार | workman | [क. २(क्)] |
| नियोक्ता | employer | [क. २ (ख्)] |
| नुकसानीचा दावा | suit for damages | [क.३] |
| व्यवस्थापन एजंट | managing agent | [क. २ (ख्)] |
| शारीरिक इजा | personal injury | [क. ३] |
| संविदेद्वारे दायित्वमुक्त करणे | contracting out | [क. ३-स. टी.] |
| सहसेवकत्व | common employment | [क. ३-स. टी.] |
| सुस्थितीमध्ये व सुरक्षित | in good and safe condition | [क. ३ (क्)] |

(शा. म. मु.) एच-४१८०-२ (१०२६-५-९७)

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**

  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४
  दूरध्वनी : ३६३ २६ ९३, ३६३ ०६ ९५
  ३६३ ११ ४८, ३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**

  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजिक,
  पुणे ४११ ००१
  दूरध्वनी : ६६ ८८ ५९

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
  दूरध्वनी : ५२ २६ १५

- **सहा. संचालक**

  शासकीय लेखनसामग्री भांडार ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ
  औरंगाबाद ४३१ ००१
  दूरध्वनी : ३३ १४ ६८

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क
  कोल्हापूर ४१६ ००३
  दूरध्वनी : ६५ ०३ ९५ व ६५ ०४ ०२

**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**